जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४४१ दिनांक - १७/१०/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १,गुन्हे शाखा,पुणे शहर

## दुचाकी चोरणा-या आरोपींकडुन वाहन चोरीचे दोन गुन्हे उघडकीस

दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १ कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे फरासखाना पोलीस स्टेशन,गुन्हा रजि नं १६१/२०२४,भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) या गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा व चोरीस गेले दुचाकी गाडीचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार अजित शिंदे व अमित गद्रे_यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळयाल्यावरून माहिती ठिकाणी गेलो असता सदर गुन्हयातील दोन संशयीत इसम चोरीच्या गाडीसह रविवार पेठ येथे मिळुन आले.त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव **१) प्रणव प्रकाश ठाकुर वय २४ वर्षे रा.रविवार पेठ फुलवाला चौक,पुणे २) अजय दत्तात्रय कुमकर वय २५ वर्षे रा.गुरूवार पेठ फुलवाला चौक पुणे** असे सांगितले.त्यांचे ताब्यातील दुचाकी गाडी ही त्यांनी रविवार पेठ परिसरातुन चोरी केली आहे असे सांगितले असता त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी आणखी एक दुचाकी चोरल्याचे कबुल केले.

वरील नमुद आरोपींकडुन एकुण ०२ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन त्यांचेकडुन ९०,०००/- रु.किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

१) फरासखाना पोलीस स्टेशन,गुन्हा रजि.नं.१६१/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)
२) समर्थ पोलीस स्टेशन,गुन्हा रजि नं.६३/२०२४, भादंवि कलम ३७९

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे शाखा १,श्री.गणेश इंगळे, व दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १,गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.नंदकुमार बिडवई यांचे मार्गदर्शनाखाली श्रेणी.पोलीस उप निरीक्षक शाहीद शेख, पोलीस अंमलदार बाळु गायकवाड, प्रदीप राठोड, धनंजय ताजणे, गणेश ढगे, अजित शिंदे, इरफान पठाण, मनिषा पुकाळे, रविंद्र लोखंडे, साईकुमार कारके, महेश पाटील, श्रीकांत दगडे, शिवाजी सातपुते, अमित गद्रे, अक्षय गायकवाड, नारायण बनकर,यांनी केली आहे.